# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः05.07.2024** **वारःशुक्रवार**

1. शांघाई सहयोग संघटनेच्या संमेलनात एस. जयशंकर यांनी घेतली चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांची भेट
2. नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाला देशभरात सुरुवात
3. महाराष्ट्रात यंदाच्या खरीप हंगामात विक्रमी 71 टक्के पेरणी पूर्ण-कृषिमंत्र्यांची माहिती
4. हाथरस दुर्घटनाप्रकरणी 6 आयोजकांना अटक आणि
5. ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पॅरिसला निघालेल्या भारतीय खेळाडूंशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साधला संवाद

**जयशंकर-शांघाई**

शांघाई सहयोग संघटना अर्थात एस सि ओ शिखर संमेलनादरम्यान, कझाकस्तानातील अस्ताना इथे काल केंद्रीय परराष्ट्रव्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांची, भेट घेतली. या संमेलनात देशाचं प्रतिनिधित्व करताना, जयशंकर यांनी दहशतवादाच्या मुद्द्यारून चीन आणि पाकिस्तानला अप्रत्यक्षपणे खडे बोल सुनावले. दहशतवादाला वेळीच आळा घातला नाही तर तो प्रादेशिक आणि जागतिक शांततेसाठी मोठा धोका ठरू शकतो असा इशारा जयशंकर यांनी यावेळी बोलताना दिला. यावेळी जयशंकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे वाचन केलं, ज्यात, दहशतवादाशी लढा हे एससीओच्या मूलभूत उद्दिष्टांपैकी एक असल्याचं नमूद करण्यात आलं होतं. या शिखर संमेलनाला चीनचे राष्ट्रपति शी जिन पिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतीन आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ उपस्थित होते.

**संपूर्णता**

नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाला देशभरात सुरुवात झाली आहे. येत्या 30 सप्टेंबरपर्यंत देशातल्या 500 तालुक्यात हे अभियान राबवलं जाणार आहे. महाराष्ट्रातील 27 तालुक्यांचा या अभियानात समावेश झाला आहे. संपूर्णता अभियानामध्ये गर्भवती महिलांची प्रसुतीपूर्व काळजी आणि त्यांना पोषक आहार, मधुमेह आणि उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींची तपासणी आणि उपचार, माती परीक्षण आणि बचतगटांना मिळणारा फिरता निधी, शाळेतील विद्यार्थ्यांचा संक्रमण दर, तसंच 10 वी आणि 12 वीमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी यावर प्राधान्यानं भर दिला जाणार आहे.

**विधिमंडळ**

महाराष्ट्रात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत विक्रमी 71 टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत 1 लाख 10 हजार हेक्टरची वाढ झाल्याची माहिती राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी काल विधानसभेत दिली. आतापर्यंत 101 लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या 3 जुलैच्या तुलनेत हे प्रमाण 20 लाख हेक्टरनं वाढलं आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्यात कुठेही खतं आणि बियाणांचा तुटवडा नाही. नियोजनापेक्षा अधिक खतं आणि बियाणं उपलब्ध आहेत, असं ते म्हणाले. राज्यातल्या दिवाळखोर सहकारी पतसंस्था आणि बँकांनी बुडवलेल्या ठेवीदारांचे किमान एक लाख रुपये परत मिळण्यासाठी स्वतंत्र निधी उभारला जात आहे, अशी माहिती सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी काल विधानसभेत दिली. आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी केलेलं निलंबन तीन दिवसांवर आणण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेनं काल

एकमतानं मंजूर केला. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

**<u>जहाज बांधणी</u>**

2030 पर्यंत भारताला जहाज बांधणी क्षेत्रातील सर्वोत्तम 10 देशांत आणि 2047 पर्यंत पहिल्या पांच देशांमध्ये स्थान मिळवून देण्यासाठी, सरकार लवकरच नवीन जहाजबांधणी आणि जहाजदुरुस्ती धोरण आणणार आहे. केंद्रीय बंदरं, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे सचिव टी के रामचंद्रन यांनी काल ही माहिती दिली. जहाजबांधणी विषयावर आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यशाळेत ते बोलत होते. जहाजबांधणी क्षेत्रातील देशांतर्गत होत असलेली मोठी मागणी, देशातील शिपयार्डकरूनच पुरी केली गेली तर, तर 2047 पर्यंत या क्षेत्रात 20 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्नाच्या संधी मिळू शकतील असंही रामचंद्रन यांनी सांगितल.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 8 आणि 9 जुलै ला रशिया दौऱ्यावर जात आहेत. रशियाचे राष्ट्रपती ब्लादीमीर पुतीन यांच्या निमंत्रणावरुंन पंतप्रधान मोदी या दौऱ्यावर जात असून ते मास्को इथ 22 व्या भारत रशिया वार्षिक शिखर बैठकीला उपस्थित राहणार आहेत. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये विविध प्रांतिक आणि वैश्विक मुददयांवर चर्चा होणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.त्यानंतर 9 आणि 10 जुलै रोजी पंतप्रधान मोदी ऑस्ट्रिया देशाच्या दौऱ्यावर जाणार असून, गेल्या 41 वर्षात भारताचे पंतप्रधान प्रथमच या देशाला भेट देणार आहेत. यावेळी पंतप्रधान मोदी राष्ट्रपति अलेक्जेंडर वान डेर बेलेन तसच चान्सलर कार्ल नेहम्मर यांच्याशी दोन्ही देशातील संबंध वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने विविध मुद्द्यावर चर्चा करणार आहेत. हे दोन्ही नेते दोन्ही देशातील उद्योगपतींशी ही चर्चा करणार आहेत. तसच पंतप्रधान मोदी मास्कोमध्ये आणि वियनामध्ये तिथल्या भारतीय समुदायाला संबोधित करणार आहेत.

**<u>एनसीआरटी</u>**

केंद्रीय शिक्षण मंडळ अर्थात सी बी एस ई अभ्यासक्रमाच्या इयत्ता तिसरी आणि सहावीची, 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठीची नवीन पाठ्यपुस्तके लवकरच उपलब्ध होणार आहे. या पाठ्यपुस्तकांची निर्मिती प्रक्रिया शेवटच्या टप्प्यात असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिली आहे. तिसरी आणि सहावीची नऊ पाठ्यपुस्तके यापूर्वीच उपलब्ध झाली असून आणखी 8 पाठ्यपुस्तके लवकरच बाजारात येणार आहेत. 2047 पर्यंतच्या अमृत काळाच्या अनुषंगानं करण्यात येणाऱ्या पाठ्यपुस्तक निर्मिती बद्दल केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शालेय शिक्षण आणि साक्षरता सचिव, केंद्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि एन सी आर टीचे संचालक यांच्याशी विस्तृत चर्चा केली.

**<u>अमरनाथ यात्रा</u>**

अमरनाथ यात्रेसाठी काल जम्मू इथल्या भगवतीनगर तळावरील शिबिरामधून 7919 भाविक 259 समूहात रवाना झाले. यात्रेकरूंची ही 7 वी तुकडी असून, त्यात 5241 पुरुष, एक हजार 435 महिला, 214 साधू आणि 13 साध्वी तसच 16 लहान मुलांचा समावेश आहे. यामध्ये बालतल आधार शिबिरासाठी 2542 तर पहलगाम शिबिरासाठी 4377 भाविक रवाना झाले असून, तिथून अमरनाथ यात्रेचा त्यांचा पुढील प्रवास सुरू होणार आहे.

**<u>अटक</u>**

उत्तरप्रदेशातील हाथरस इथ सत्संगाच्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटने प्रकरणी 6 जणांना पोलिसांनी काल अटक केली. यामध्ये 4 पुरुष आणि दोन महिलांचा समावेश असून ते या सत्संग कार्यक्रम आयोजन समितीचे सदस्य आणि सेवादार आहेत. अलिगड विभागाचे पोलिस अधिकारी शल्लभ मथुर यांनी ही माहिती दिली. या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रकाश मधुरकर हा फरार असून, त्याच्या बद्दल माहिती देणाऱ्या व्यक्तीला एक लाख

रुपायांच बक्षिस जाहीर करण्यात आल आहे. हाथरस  चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेत 121 जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

**पंतप्रधान-ऑलिंपिक संघ**

ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पॅरिसला निघालेल्या भारतीय खेळाडूंशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संवाद साधला. खेळाडू सर्वोत्तम कामगिरी करतील आणि देशाला गौरव प्राप्त करून देतील असा आपल्याला विश्वास आहे. या खेळाडूंचा आजवरचा प्रवास आणि त्यांचं यश, देशवासियांना नवी प्रेरणा देईल असं पंतप्रधानांनी समाजमध्यमांवरील संदेशांत म्हटलं आहे.

**कुशारे-ऑलिंपिक**

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातल्या देवगाव इथल्या सर्वेश कुशारे याची पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत उंच उडीसाठी निवड झाली आहे. हरयाणातल्या पंचकुला झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत 2 पूर्णांक 25 मीटर उंच उडी मारत ऑलिम्पिकची पात्रता फेरी गाठली आहे. ऑलिंपिकच्या या क्रीडा प्रकारासाठी निवड होणारा सर्वेश हा राज्यातला पहिला खेळाडू आहे.

**विश्वचषक संघ-सत्कार**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून बार्बाडोसहून मायदेशी परतलेल्या भारतीय संघाची, काल मुंबईत लाखो क्रिकेटप्रेमींच्या साक्षीनं अत्यंत जल्लोषात विजयी मिरवणूक काढण्यात आली. मरीन ड्राईव्हपासून वानखेडे स्टेडीयमपर्यंत खुल्या बसमधून निघालेल्या या मिरवणुकीच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा जमलेले चाहते हातात तिरंगा घेऊन, आणि आपल्या लाडक्या खेळाडूंच्या नावाच्या घोषणा देत त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करत होते. तत्पूर्वी काल सकाळी दिल्लीत भारतीय संघानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी पंतप्रधानांनी क्रिकेट संघाला शाबासकी दिली. दरम्यान टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघातील, मुंबईतील चार क्रिकेटपटूंना सन्मानित करण्यासाठी आज मुंबईत एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी काल विधानसभेत हा प्रस्ताव मांडला. आज विधानभवन संकुलात हा कार्यक्रम  होणार आहे. कर्णधार रोहित शर्मासोबतच सूर्यकुमार यादव, शिवम दुबे आणि यशस्वी जैस्वाल यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.